दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप
उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उपसंपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

बीड महाराष्ट्र | गुरुवार, 11 जून 2026 |
अंक क्र. 38 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कारकिर्दीचा नवा विक्रम ; ना. पंकजाताई मुंडे मुंबादेवीच्या चरणी नतमस्तक

■ मुंबई वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या पंतप्रधान पदाच्या यशस्वी कारकिर्दीचा नवा विक्रम प्रस्थापित केल्याबद्दल राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज मुंबादेवी मंदिरात जाऊन देवीच्या चरणी नतमस्तक होऊन महाआरती केली. नरेंद्र मोदी यांनी भारतीय लोकशाहीच्या इतिहासात जनादेशाचा नवा विक्रम प्रस्थापित केला असून पंतप्रधान म्हणून सर्वाधिक ४ हजार ३९९ दिवसांचा यशस्वी कार्यकाळ पूर्ण केला आहे.त्यांचा हा कार्यकाळ असाच उत्तरोत्तर वाढत जावो आणि त्यांच्या खंबीर नेतृत्वात देशाच्या प्रगतीचा हा यशस्वी प्रवास अविरत सुरू राहो, अशा शब्दांत ना. पंकजाताई मुंडे यांनी आज मुंबईची ग्रामदेवता, आई जगत्जननी श्री मुंबादेवीचे दर्शन घेत प्रार्थना केली. याप्रसंगी भाजपचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







# प्रत्येकामध्ये वाचनाची गोडी निर्माण होणे काळाची गरज : ज्येष्ठ साहित्यिक दगडूदादा लोमटे

## परळीतील डॉ.भालचंद्र सार्वजनिक वाचनालयास ज्येष्ठ साहित्यिक दगडूदादा लोमटे यांची सदिच्छा भेट

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

आजच्या डिजिटल युगात मोबाईल आणि इंटरनेटच्या वाढत्या वापरामुळे माहितीचे स्रोत वाढले असले, तरी वाचनातून मिळणारे ज्ञान, चिंतन आणि वैचारिक समृद्धी याला कोणताही पर्याय नाही, समाजात ज्ञान, संस्कार आणि वैचारिक समृद्धी वाढविण्यासाठी प्रत्येकामध्ये वाचनाची गोडी निर्माण होणे आवश्यक असल्याचे मत ज्येष्ठ साहित्यिक, अभ्यासू विचारवंत तथा अंबानगरीचे भूमिपुत्र दगडूदादा लोमटे यांनी परळीतील डॉ.भालचंद्र सार्वजनिक वाचनालयास ज्येष्ठ साहित्यिक दगडूदादा लोमटे यांची सदिच्छा भेट दिली त्या प्रसंगी व्यक्त केले.

परळी वैजनाथ शहरातील डॉ.भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाकडे सध्या ४१,२८८ हजारांहून अधिक पुस्तकांची समृद्ध ग्रंथसंपदा असणाऱ्या नगर परिषदेच्या डॉ. भालचंद्र सार्वजनिक वाचनालयास ज्येष्ठ साहित्यिक, अभ्यासू विचारवंत तथा अंबानगरीचे भूमिपुत्र दगडूदादा लोमटे यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी वाचनालयातील विविध सुविधा, ग्रंथसंपदा तसेच वाचनासाठी उपलब्ध वातावरणाची पाहणी करून त्यांनी वाचनालयाच्या कार्याचे कौतुक केले. वाचन संस्कृतीच्या जतन व संवर्धनाबाबत त्यांनी पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी मनमोकळा संवादही साधला.

साहित्यसेवेचा एक भाग म्हणून दगडूदादा लोमटे यांनी वाचनालयास विविध विषयांवरील दर्जेदार व उपयुक्त पुस्तकांची भेट दिली. या पुस्तकांमुळे वाचनालयाच्या ग्रंथसंपदेत भर पडणार असून विद्यार्थी, स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे युवक, ज्येष्ठ नागरिक आणि साहित्यप्रेमी वाचकांना त्याचा लाभ होणार आहे. यावेळी बोलताना ते म्हणाले की, मोबाईल आणि इंटरनेट हे आजच्या काळातील आवश्यक साधन असले तरी वाचनाची सवय कायम राहणे तितकेच महत्त्वाचे आहे. पुस्तकांच्या सहवासातून विचारांना दिशा मिळते, व्यक्तिमत्त्व घडते आणि समाज अधिक सुसंस्कृत बनतो. त्यामुळे लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत प्रत्येकामध्ये वाचनाची गोडी निर्माण होणे ही काळाची गरज आहे. "मानवी जीवनात ग्रंथांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. केवळ ग्रंथसंग्रह असून चालत नाही, तर श्रवण, आकलन आणि वाचन या त्रिसूत्रीची जोपासना होणे आवश्यक आहे. आजच्या धावपळीच्या युगात वाचन ही प्रत्येक व्यक्तीची गरज बनली आहे. वाचन हा केवळ छंद नसून व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी साधन आहे," असेही त्यांनी नमूद केले.

परळी शहरात आजही विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा देणारे युवक, ज्येष्ठ नागरिक, साहित्यप्रेमी आणि अभ्यासक मोठ्या संख्येने वाचनालयाचा लाभ घेत असल्याचे पाहून समाधान वाटत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. ज्ञानार्जनाची ओढ आणि पुस्तकांविषयीचे प्रेम हीच परळीची खरी ओळख असल्याचेही त्यांनी सांगितले.

माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक बाजीराव धर्माधिकारी म्हणाले की, "आजच्या स्पर्धेच्या युगात पुस्तकांशी नाते जोडणारी पिढी घडणे आवश्यक आहे. दगडूदादा लोमटे यांनी वाचनालयास दिलेली भेट आणि ग्रंथदान हे विद्यार्थी व वाचकांसाठी प्रेरणेचे स्रोत ठरणार आहे. ज्ञान, संस्कार आणि विचारांची परंपरा जपण्याचे कार्य ग्रंथालयांच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे घडत आहे."

ज्येष्ठ साहित्यिक, अभ्यासू विचारवंत तथा अंबानगरीचे भूमिपुत्र दगडूदादा लोमटे यांचे साहित्य, विचार आणि समाजप्रबोधनाचे कार्य अनेकांसाठी मार्गदर्शक राहिले आहे. त्यांच्या हस्ते डॉ. भालचंद्र वाचनालयाच्या ग्रंथसंपदेत झालेली भर ही परळीच्या वाचन चळवळीस बळ देणारी आहे. अशा अभ्यासू आणि साहित्यिक व्यक्तिमत्त्वांचा वाचनालयाशी असलेला संवाद विद्यार्थी व नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरत असल्याचे शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे यांनी सांगितले.

यावेळी डॉ. भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक बाजीराव धर्माधिकारी व शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे यांच्या हस्ते दगडूदादा लोमटे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे, नगरसेवक अनंत इगळे, अब्दुल करीम, उमेश खाडे, सचिन स्वामी, गिरीष भोसले, शंकर साळवे, गंगाधर जगतकर आदी उपस्थित होते.





# मुद्रात उतरण्याआधी आईशी झाला शेवटचा संवाद; तारकर्लीत पुण्याचा तरुण बुडून बेपत्ता

■ सिंधुदुर्ग : वृत्तसंस्था

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तारकर्ली एमटीडीसीसमोरील समुद्रात आंघोळीसाठी उतरलेल्या पुण्यातील दोन पर्यटकांपैकी एक तरुण पाण्यात बुडून बेपत्ता झाला. ही हृदयद्रावक घटना काल सायंकाळी साडेचारच्या सुमारास घडली. स्थानिक ग्रामस्थांनी जीवाची पर्वा न करता समुद्रात उड्या मारत एका तरुणाला सुखरूप बाहेर काढले, मात्र दुसरा तरुण लाटांच्या तडाख्यात खोल समुद्रात वाहून गेला.

समर्थ गणेश कर्पे (वय २२, रा. आंबेगाव, पुणे) असे बेपत्ता झालेल्या तरुणाचे नाव असून ऋषभ रविकिरण कदम याला स्थानिकांच्या मदतीने वाचवण्यात आले. सध्या त्याच्यावर मालवण ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, समर्थ कर्पे आणि ऋषभ कदम हे दोघेही पुण्यातील 'रेवती एन्टरप्रायजेस'मध्ये कार्यरत होते. १९ मे रोजी ते सिंधुदुर्ग जिल्ह्यात आले होते. समाजकल्याण विभागाशी संबंधित कार्यालयीन काम पूर्ण केल्यानंतर त्यांनी मालवणमध्ये पर्यटनासाठी थांबण्याचा निर्णय घेतला होता.

दुपारच्या सुमारास दोघेही तारकर्ली येथील एमटीडीसी रिसॉर्टसमोरील समुद्रात आंघोळीसाठी उतरले. सुरुवातीला सर्व काही सुरळीत सुरू होते. मात्र काही वेळातच समुद्रातील पाण्याचा वेग आणि वाढत्या लाटांचा अंदाज न आल्याने दोघेही खोल पाण्याकडे ओढले जाऊ लागले. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे लक्षात येताच त्यांनी मदतीसाठी जोरदार आरडाओरडा सुरू केला.

किनाऱ्यावर उपस्थित असलेल्या स्थानिक ग्रामस्थांनी त्यांचा आवाज ऐकताच क्षणाचाही विलंब न लावता समुद्रात उड्या मारल्या. संकेत तारी, दत्तराज चव्हाण, वैभव खोबरेकर, महेंद्र चव्हाण आणि वैभव सावंत या ग्रामस्थांनी मोठ्या धाडसाने बचावकार्य सुरू केले. अथक प्रयत्नांनंतर त्यांनी ऋषभ कदम याला सुखरूप बाहेर काढण्यात यश मिळवले. मात्र समर्थ कर्पे हा प्रचंड वेगाने येणाऱ्या लाटांमध्ये अडकला आणि खोल समुद्रात वाहून गेला. दरम्यान, ऋषभची प्रकृती गंभीर असल्याने त्याला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात नेण्याची गरज होती. यासाठी '१०८' रुग्णवाहिकेला संपर्क करण्यात आला होता. मात्र तब्बल अर्धा तास उलटूनही रुग्णवाहिका घटनास्थळी पोहोचली नाही. अखेर वेळ न दवडता स्थानिकांनीच पुढाकार घेत ऋषभला दुचाकीवरून मालवण ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. या संपूर्ण घटनेतील सर्वाधिक हळवी आणि मन सुन्न करणारी बाब म्हणजे, समुद्रात उतरण्यापूर्वी समर्थ कर्पे याचा त्याच्या आईसोबत झालेला शेवटचा संवाद. समुद्रकिनारी असताना ऋषभच्या मोबाईलवर समर्थच्या आईचा फोन आला होता. ऋषभने तो फोन समर्थकडे दिला. समर्थने आईशी काही वेळ निवांत संवाद साधला, त्यानंतर फोन ठेवला आणि पुन्हा समुद्रात उतरला. मात्र काही क्षणांतच ही दुर्दैवी घटना घडली.

# सिंधुदुर्गातील अवकाळीग्रस्तांना तातडीने मदत द्या ; पालकमंत्री नितेश राणे यांचे प्रशासनाला आदेश

■ मुंबई : वृत्तसंस्था

सिंधुदुर्ग जिल्ह्यात अलीकडेच झालेल्या अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, नुकसानग्रस्त नागरिकांना कोणताही विलंब न लावता सर्वोतोपरी मदत उपलब्ध करून द्या, असे आदेश जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे (Nitesh Rane) यांनी सोमवारी दिले. मंत्रालयात आयोजित विशेष आढावा बैठकीत त्यांनी प्रत्येक तालुकानिहाय नुकसानीचा सविस्तर आढावा घेतला आणि प्रशासनाला युद्धपातळीवर काम करण्याचे निर्देश दिले.

वादळामुळे जिल्ह्यातील वीज यंत्रणेचे मोठे नुकसान झाले असून अनेक भागांतील पाणीपुरवठाही खंडित झाला आहे. त्यामुळे नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी महावितरणने तातडीने दुरुस्तीची कामे हाती घ्यावीत. वीज आणि पाणीपुरवठा लवकरात लवकर सुरळीत करण्यासोबतच प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लोकांशी सातत्याने संवाद ठेवावा. लोकांच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्याला सर्वोच्च प्राधान्य दिले जावे, असे निर्देश मंत्री राणे यांनी दिले.

येत्या काही दिवसांत सुरू होणारा पावसाळा आणि 'एल-निनो'च्या प्रभावामुळे हवामानात होणारे संभाव्य बदल लक्षात घेता, प्रशासनाने गाफील न राहता पूर्वतयारी करावी, अशा सूचनाही पालकमंत्र्यांनी दिल्या. महावितरणसह सर्वच विभागांनी पुरेसे मनुष्यबळ, आवश्यक यंत्रसामग्री आणि आपत्कालीन परिस्थितीसाठी 'ब्रेकडाऊन पथके' सज्ज ठेवावीत. तसेच संपर्कयंत्रणा अधिक सक्षम करण्यावर भर देण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

## जिल्हाधिकाऱ्यांकडून घेतला परिस्थितीचा आढावा

■ पालकमंत्र्यांसोबतच्या या बैठकीला सिंधुदुर्गच्या जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे दूरदृश्य प्रणालीद्वारे (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील सद्यस्थिती आणि राबवण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. या बैठकीला महावितरणचे वरिष्ठ अधिकारी आणि संबंधित विभागांचे प्रमुख उपस्थित होते.



## संपादकीय

# सहकार्याची परतफेड की आघाडी धर्माला बगल?

पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ हा नेहमीच राजकीयदृष्ट्या अतिशय संवेदनशील आणि बलाढ्य समजला जातो. पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, जिल्ह्यातील नगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांचे निवडून आलेले सदस्य या निवडणुकीत मतदार असतात. त्यामुळे जिल्हापातळीवरील सत्तेचे खरे नियंत्रण कोणाकडे आहे, हे दाखवण्याची ही एक सुवर्णसंधी मानली जाते.

या निवडणुकीच्या घोषणेपासूनच महायुती आणि महाविकास आघाडी (मविआ) या दोन्ही बाजूंनी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली होती. विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर शरद पवार गट आणि अजित पवार गट यांच्यासाठी हा मतदारसंघ प्रतिष्ठेचा बनला होता. त्यातच महायुतीमध्ये भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्याकडूनही या जागेवर दावा केला जात होता. मात्र, वरिष्ठ पातळीवर चर्चा होऊन ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार गट) सोडण्याचा निर्णय झाला.राष्ट्रवादी काँग्रेसकडून सुनील टिंगरे, दीपक मानकर, विलास लांडे, योगेश बहल आदी निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक होते. पण, उमेदवारी मिळवण्यात विक्रम काकडे यांनी बाजी मारली. राष्ट्रवादीकडूनही विक्रम काकडे यांच्यावर विश्वास दाखवण्यात आला. विक्रम काकडे हे पार्थ पवार यांचे निकटवर्तीय मानले जातात. विक्रम काकडे हे बिनविरोध निवडून आल्याने पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस अशी थेट लढत पाहायला मिळाली नाही.

या निवडणुकीतील सर्वात मोठा ट्विस्ट म्हणजे महाविकास आघाडीने अखेरच्या क्षणी घेतलेली माघार! मविआकडून सुरुवातीला अत्यंत तगडा उमेदवार देण्याची तयारी सुरू होती. शरद पवार गटाने ही निवडणूक अत्यंत गांभीर्याने घेतली होती. मात्र, उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी कमालीच्या गुप्त घडामोडी घडल्या. काकडे आणि टिंगरे यांनी समोरासमोर बसूनच फॉर्म भरले. दुसऱ्या बाजूला जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रदीप कंद यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. तसेच विक्रम काकडे यांचे वडील संजय काकडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. भाजप आणि शिवसेनेच्या काही स्थानिक नेत्यांनी अपक्ष किंवा बंडखोर उमेदवार उभे करण्याची तयारी दर्शवली होती, तसेच राष्ट्रवादी काँग्रेसमधील काही नाराज नेत्यांनीही बंडखोरीचा पवित्रा घेतला होता. अशा अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या. मात्र, महायुतीतील वरिष्ठ नेत्यांच्या मध्यस्थीमुळे ही बंडखोरी शमवण्यात महायुतीला यश आले. अखेरच्या क्षणी सुनील टिंगरे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार श्रीकांत पाटील यांनी शरद पवार यांच्या सूचनेनुसार माघार घेतल्याने विक्रम काकडे यांचा विजयाचा मार्ग सुकर झाला. वास्तविक महाविकास आघाडीत काँग्रेस, ठाकरेसेना व राष्ट्रवादी असे तीन पक्ष आहेत. पण, ही जागा राष्ट्रवादीच्या वाट्याला आली होती. त्यामुळे आघाडी धर्म म्हणून राष्ट्रवादीने ही जागा लढवणे अपेक्षित होते; परंतु येथेही शरद पवारांनी नेहमीप्रमाणे धक्कातंत्राचा अवलंब केल्याचे दिसते. शरद पवारांचे राजकारण अनेकदा बुचकळ्यात टाकणारे असते. पुण्यातही राष्ट्रवादी उमेदवाराविरोधात माघार घेऊन त्यांनी एकप्रकारे महायुतीला सहाय्य केल्याचे दिसून आले. त्यामुळे काँग्रेसचा संताप होणे स्वाभाविकच होते.

'पुणे विभाग विधान परिषद निवडणुकीसाठी मी अर्ज दाखल केला होता. मात्र, या निवडणुकीत कोणत्याही प्रकारचा घोडेबाजार होऊ नये, लोकशाही मूल्यांचे रक्षण व्हावे आणि निवडणूक प्रक्रियेची पवित्रता अबाधित राहावी, या व्यापक भूमिकेतून पक्षाने निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या विनंतीला मान देत तसेच शरदचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनानुसार हा निर्णय घेतला आहे,' असे श्रीकांत पाटील यांनी नंतर स्पष्ट केले. पवारांचे राजकारण कसे आणि कुठे फिरते, याचा हा एक उत्तम नमुना आहे.२०१२ मध्ये जेव्हा राज्यसभेच्या जागांसाठी निवडणुका होत्या, तेव्हा विक्रम काकडे यांचे वडील संजय काकडे यांनी अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज भरला होता. त्यावेळी शरद पवार यांनी त्यांना उमेदवारी मागे घेण्याची विनंती केली होती. त्यानंतर संजय काकडे यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. २०१४ च्या राज्यसभेच्या निवडणुकीत मात्र संजय काकडे यांनी उमेदवारी अर्ज कायम ठेवला आणि ते निवडूनही आले होते. २०१२ मध्ये काकडे यांनी दाखवलेल्या सामंजस्याची जाणीव ठेवतच शरद पवार यांनी श्रीकांत पाटील यांना माघार घ्यायला लावली आणि तेव्हाच्या सहकार्याची परतफेड केली, असे म्हटले जाते. ते काहीही असले, तरी दुहेरी भूमिका घेण्याचे त्यांचे कौशल्य जबरदस्तच म्हणता येईल. अजित पवार यांच्या अचानक झालेल्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची धुरा त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी अत्यंत सक्षमपणे सांभाळली आहे. सुनेत्रा पवार, जय पवार आणि पार्थ पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने पुण्यातील स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघावर आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. पक्षांतर्गत बंडखोरी शमवून आणि विरोधकांशी पडद्याआड तडजोड करून मिळवलेला हा विजय महायुतीच्या संघटन कौशल्याची आणि राजकीय ताकदीची साक्ष देतो. या विजयामुळे पुणे जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघावरील महायुतीची पकड पुन्हा एकदा अत्यंत मजबूत झाली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि विधानसभा निवडणुकांसाठी महायुतीला यामुळे मोठा फायदा मिळणार आहे. या संपूर्ण निवडणुकीवरून हे स्पष्ट होते की, पुणे विधान परिषद निवडणूक केवळ मतांच्या तांत्रिक गणितापुरती मर्यादित नव्हती, तर ती जुने राजकीय ऋणानुबंध, कौटुंबिक तडजोडी आणि भविष्यातील राजकीय डावपेचांची एक उत्तम झलक होती.

# खेळ : आनंद आणि विकासाचा उत्सव : डॉ. राजेंद्र बगाटे

**दि. ११ जून हा दिवस संपूर्ण जगभरात 'आंतरराष्ट्रीय खेळ दिन' म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेने २०२४ मध्ये या दिवसाला अधिकृत मान्यता देत खेळाच्या माध्यमातून बालकांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याचा महत्त्वपूर्ण संदेश दिला. खेळ ही केवळ करमणूक नसून ती बालकांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक आणि सामाजिक विकासाची एक अत्यावश्यक प्रक्रिया आहे. आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि तंत्रज्ञानप्रधान युगात खेळाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे. बालकांच्या जीवनातील आनंद, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता आणि आत्मविश्वास वाढविण्यासाठी खेळाची आवश्यकता आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय खेळ दिन हा केवळ एक औपचारिक दिवस नसून मानवी विकासाच्या मूलभूत हक्कांचा आणि मूल्यांचा गौरव करणारा दिवस आहे.**



खेळ हा प्रत्येक बालकाचा जन्मसिद्ध हक्क आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या बालहक्क करारातील कलम ३१ नुसार प्रत्येक बालकाला विश्रांती, खेळ, मनोरंजन आणि सांस्कृतिक जीवनात सहभागी होण्याचा अधिकार आहे. तथापि, जगातील अनेक बालके गरिबी, युद्धस्थिती, बालमजुरी, शिक्षणातील असमानता, सुरक्षित खेळाच्या जागांचा अभाव आणि सामाजिक विषमता यांमुळे या हक्कापासून वंचित राहत आहेत. वाढते शहरीकरण आणि तंत्रज्ञानाचा अतिरेक यामुळेही बालकांच्या खेळण्याच्या संधी कमी होत आहेत. या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय खेळ दिन समाजाला खेळाच्या हक्काची आठवण करून देतो आणि बालकांना सुरक्षित, मुक्त आणि सर्वसमावेशक वातावरण उपलब्ध करून देण्याचे आवाहन करतो.

बालकांच्या शारीरिक विकासात खेळाचे योगदान अनन्यसाधारण आहे. धावणे, उड्या मारणे, सायकल चालविणे, पोहणे, चेंडूचे विविध खेळ आणि इतर शारीरिक हालचालींमुळे स्नायू बळकट होतात, शरीरातील समन्वय वाढतो आणि आरोग्य उत्तम राहते. नियमित खेळामुळे लठ्ठपणा, मधुमेह, हृदयरोग यांसारख्या जीवनशैलीशी संबंधित समस्यांचा धोका कमी होतो. लहानपणापासून सक्रिय जीवनशैलीची सवय लागल्यास निरोगी भवितव्याची पायाभरणी होते. सध्याच्या काळात मोबाइल, दूरदर्शन आणि संगणकासमोर वाढता वेळ घालवल्यामुळे मुलांच्या शारीरिक हालचालींमध्ये घट होत आहे. परिणामी आरोग्याशी संबंधित विविध समस्या निर्माण होत आहेत. त्यामुळे मैदानी खेळांना प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे.

खेळ मानसिक आरोग्याच्या दृष्टीनेही तितकाच महत्त्वाचा आहे. खेळताना मुलांमध्ये आनंद, उत्साह आणि समाधानाची भावना निर्माण होते. विविध परिस्थितींना सामोरे जाताना समस्या सोडविण्याची क्षमता, निर्णयक्षमता आणि विचारशक्ती विकसित होते. जिंकण्याचा आनंद आणि पराभवाचा स्वीकार या दोन्ही अनुभवांमधून मुलांमध्ये मानसिक स्थैर्य निर्माण होते. आज अनेक मुले अभ्यासाचा ताण, स्पर्धेचे दडपण आणि सामाजिक अपेक्षांमुळे मानसिक तणावाचा सामना करत आहेत. अशा परिस्थितीत खेळ हा तणावमुक्तीचा प्रभावी मार्ग ठरतो. खेळामुळे आत्मविश्वास वाढतो आणि जीवनातील आव्हानांना सकारात्मकतेने सामोरे जाण्याची तयारी होते.

भावनिक विकासाच्या प्रक्रियेतही खेळ महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो. मुलांना आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी खेळ नैसर्गिक माध्यम उपलब्ध करून देतो. खेळातील विविध अनुभवांमुळे संयम, सहनशीलता आणि आत्मनियंत्रण विकसित होते. संघातील इतर सदस्यांशी जुळवून घेताना परस्पर सहकार्याची भावना निर्माण होते. इतरांच्या भावनांचा आदर करणे आणि सामूहिक यशासाठी प्रयत्न करणे यांसारखे गुण खेळातून सहज आत्मसात होतात. त्यामुळे भावनिक परिपक्वतेच्या दृष्टीने खेळाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

सामाजिक विकासात खेळाचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. खेळ विविध पार्श्वभूमीच्या व्यक्तींना एकत्र आणतो. मैदानावर जात, धर्म, भाषा किंवा आर्थिक स्थिती यांपेक्षा खेळाडू म्हणून प्रत्येकाची ओळख महत्त्वाची ठरते. संघभावना, नेतृत्व, शिस्त, परस्पर आदर आणि सामूहिक जबाबदारीची भावना खेळातून विकसित होते. समाजातील विविध घटकांमध्ये एकात्मता निर्माण करण्याची ताकद खेळामध्ये आहे. त्यामुळे सामाजिक सलोखा आणि बंधुभाव वृद्धिंगत होण्यास मदत होते.

भारतीय संस्कृतीमध्ये खेळांना प्राचीन परंपरा लाभली आहे. कबड्डी, खो-खो, विटीदांडू, कुस्ती, मल्लखांब यांसारख्या पारंपरिक खेळांनी अनेक पिढ्यांचे बालपण समृद्ध केले आहे. हे खेळ शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच चपळता, धैर्य आणि सामूहिक सहभागाची भावना विकसित करतात. मात्र, आधुनिक जीवनशैली आणि बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळे या खेळांचे प्रमाण घटत चालले आहे. खेळण्यासाठी मोकळ्या जागांचा अभाव, अभ्यासाचा वाढता ताण आणि डिजिटल साधनांचे आकर्षण यांमुळे मुलांचे मैदानी खेळांकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे पारंपरिक खेळांचे जतन आणि संवर्धन करण्याची गरज निर्माण झाली आहे.

तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे डिजिटल खेळांचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला आहे. काही शैक्षणिक आणि बौद्धिक खेळ मुलांच्या ज्ञानवृद्धीसाठी उपयुक्त ठरू शकतात; मात्र डिजिटल खेळांचा अतिरेक शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम करू शकतो. स्क्रीनसमोर जास्त वेळ घालवल्यामुळे डोळ्यांचे विकार, झोपेच्या समस्या, एकाग्रतेचा अभाव आणि सामाजिक संवादात घट यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे तंत्रज्ञानाचा संतुलित वापर करून मुलांना मैदानी खेळांसाठी प्रोत्साहित करणे आवश्यक आहे.

शाळा आणि शैक्षणिक संस्थांची भूमिका या संदर्भात अत्यंत महत्त्वाची आहे. अनेकदा परीक्षाकेंद्रित शिक्षणपद्धतीमुळे खेळाला दुय्यम स्थान दिले जाते. परिणामी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या संधी मर्यादित होतात. खेळ हा शिक्षणाचा अविभाज्य भाग मानून शाळांमध्ये पुरेशा सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. प्रशिक्षित क्रीडाशिक्षकांची नियुक्ती, विविध खेळांचे प्रशिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार उपक्रमांची आखणी यांमुळे खेळ संस्कृतीला चालना मिळू शकते. शिक्षण आणि खेळ यांचा समतोल राखल्यास विद्यार्थी अधिक सक्षम, आत्मविश्वासू आणि जबाबदार नागरिक बनू शकतात.

पालकांची मानसिकता बदलणेही तितकेच आवश्यक आहे. अनेक पालक मुलांच्या शैक्षणिक यशाला प्राधान्य देऊन खेळाला वेळेचा अपव्यय समजतात. मात्र, खेळ हा मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यावश्यक आहे. पालकांनी मुलांना खेळण्यासाठी वेळ उपलब्ध करून देणे, त्यांच्या आवडी-निवडी समजून घेणे आणि विजय-पराजयाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्यास प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. मुलांसोबत खेळात सहभागी झाल्यास कौटुंबिक नातेसंबंध अधिक दृढ होऊ शकतात.

लिंगभाव समानतेच्या दृष्टीने खेळाचे महत्त्व विशेष आहे. अनेक ठिकाणी मुलींच्या खेळातील सहभागावर विविध सामाजिक बंधने असतात. सुरक्षिततेचा अभाव, सुविधांची कमतरता आणि रूढीवादी विचारसरणी यांमुळे मुलींना खेळाच्या समान संधी मिळत नाहीत. मात्र, खेळामुळे मुलींमध्ये आत्मविश्वास वाढतो, नेतृत्वगुण विकसित होतात आणि सक्षमीकरणाची प्रक्रिया वेगाने घडते. त्यामुळे मुला-मुलींना समान संधी उपलब्ध करून देणे ही समाजाची जबाबदारी आहे.

दिव्यांग व्यक्तींसाठी खेळ हे सामाजिक समावेशनाचे प्रभावी माध्यम आहे. त्यांच्या क्षमतांनुसार तयार केलेले खेळ आत्मविश्वास वाढविण्यास मदत करतात. पॅरालिंपिक स्पर्धांमधील खेळाडूंची कामगिरी ही प्रेरणादायी आहे. दिव्यांग मुलांना खेळाच्या समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी समाजाने आवश्यक सुविधा आणि सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे.

खेळ हा शांतता आणि सामाजिक ऐक्य निर्माण करणारा महत्त्वपूर्ण घटक आहे. संघर्षग्रस्त भागांमध्येही खेळाच्या माध्यमातून संवाद आणि विश्वास निर्माण करण्याचे प्रयत्न केले जातात. विविध संस्कृतींतील लोकांना एकत्र आणण्याची क्षमता खेळामध्ये आहे. त्यामुळे जागतिक शांतता आणि बंधुभाव वाढीस लागण्यास मदत होते. संयुक्त राष्ट्रसंघाने शाश्वत विकास उद्दिष्टांच्या पूर्ततेमध्ये खेळाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. आरोग्य, शिक्षण, लिंगसमानता आणि सामाजिक समावेशन यांसारख्या उद्दिष्टांच्या दिशेने खेळ प्रभावी योगदान देऊ शकतो.

भारतामध्ये क्रीडा क्षेत्रात गेल्या काही दशकांत उल्लेखनीय प्रगती झाली आहे. विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारतीय खेळाडूंनी देशाचा गौरव वाढविला आहे. शासनाच्या विविध योजनांद्वारे क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन दिले जात आहे. 'खेलो इंडिया'सारख्या उपक्रमांमुळे तळागाळातील प्रतिभेला संधी उपलब्ध होत आहे. तथापि, ग्रामीण भागातील अपुऱ्या सुविधा, प्रशिक्षकांची कमतरता आणि आर्थिक अडचणी यांसारखी आव्हाने अद्यापही कायम आहेत. त्यामुळे सर्व स्तरांवर क्रीडा सुविधांचा विकास करणे आवश्यक आहे.

आंतरराष्ट्रीय खेळ दिनाच्या निमित्ताने आपण खेळाकडे नव्या दृष्टीकोनातून पाहण्याची गरज आहे. खेळ हा केवळ स्पर्धा जिंकण्याचे साधन नसून जीवनमूल्ये विकसित करणारी प्रक्रिया आहे. प्रामाणिकपणा, शिस्त, संघभावना, चिकाटी आणि नेतृत्व यांसारखे गुण खेळातून विकसित होतात. प्रत्येक बालकाला सुरक्षित आणि आनंददायी वातावरणात खेळण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा, स्वयंसेवी संस्था, पालक आणि समाज यांनी एकत्रितपणे खेळपूरक वातावरण निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

शहरीकरणाच्या वाढत्या प्रक्रियेमुळे खेळाच्या मैदानांची संख्या कमी होत आहे. उंच इमारती, वाहतुकीची समस्या आणि सार्वजनिक जागांचा अभाव यांमुळे मुलांच्या खेळण्याच्या संधी मर्यादित होत आहेत. त्यामुळे शहरांच्या नियोजनामध्ये खेळाच्या मैदानांना आणि उद्यानांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. सुरक्षित आणि सुलभ सार्वजनिक जागा निर्माण झाल्यास बालकांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल.

प्रौढ व्यक्तींसाठीही खेळाचे महत्त्व कमी नाही. नियमित व्यायाम, मनोरंजनात्मक क्रीडा आणि शारीरिक उपक्रम यांमुळे तणाव कमी होतो, सामाजिक संबंध दृढ होतात आणि जीवनमान सुधारते. आजच्या धकाधकीच्या जीवनात निरोगी राहण्यासाठी खेळाची गरज अधिक वाढली आहे. त्यामुळे खेळ ही केवळ बालपणापुरती मर्यादित बाब नसून जीवनाच्या प्रत्येक टप्प्यात महत्त्वपूर्ण ठरते.

आंतरराष्ट्रीय खेळ दिन हा प्रत्येकाला बालपणातील आनंदाची आठवण करून देणारा दिवस आहे. मातीमध्ये खेळण्याचा आनंद, मित्रांसोबत धावण्याची उत्सुकता, संघाने जिंकलेल्या सामन्याचे समाधान आणि पराभवानंतर पुन्हा उभे राहण्याची जिद्द हे सर्व अनुभव जीवन समृद्ध करतात. खेळ माणसाला अधिक संवेदनशील, सहकार्यशील आणि सकारात्मक बनवतो.

आजच्या काळात मुलांना खेळासाठी वेळ आणि जागा उपलब्ध करून देणे ही एक सामाजिक जबाबदारी बनली आहे. अभ्यास, स्पर्धा आणि तंत्रज्ञानाच्या प्रभावामध्ये बालपण हरवू नये यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. खेळ हा मुलांच्या आनंदाचा, आरोग्याचा आणि विकासाचा अविभाज्य भाग आहे. म्हणूनच प्रत्येक बालकाला मुक्तपणे खेळण्याचा अधिकार मिळावा आणि त्या अधिकाराचे संरक्षण व्हावे, यासाठी समाजाने सजग राहणे गरजेचे आहे.

आंतरराष्ट्रीय खेळ दिन आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतो की खेळ ही चैनीची गोष्ट नसून मानवी विकासाची मूलभूत गरज आहे. खेळामधून निर्माण होणारा आनंद, आत्मविश्वास, मैत्री, शिस्त आणि सहकार्याची भावना समाजाला अधिक सुदृढ बनवते. त्यामुळे बालकांपासून प्रौढांपर्यंत प्रत्येकाने आपल्या जीवनात खेळासाठी स्थान निर्माण केले पाहिजे.

खेळ म्हणजे जीवनातील उत्साहाचा झरा, सर्जनशीलतेचा अविष्कार आणि आरोग्यपूर्ण समाजाच्या निर्मितीचे प्रभावी साधन होय. आंतरराष्ट्रीय खेळ दिनाच्या निमित्ताने आपण प्रत्येक बालकाच्या खेळण्याच्या हक्काचा आदर करूया, मैदाने जपूया, खेळ संस्कृतीला प्रोत्साहन देऊया आणि निरोगी, आनंदी, समावेशक समाज घडविण्याच्या दिशेने वाटचाल करूया. कारण खेळ ही केवळ विरंगुळ्याची कृती नाही; ती मानवतेचा उत्सव आहे, आनंदाचा श्वास आहे आणि उज्ज्वल भविष्याची आशादायी सुरुवात आहे.

**■ - डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# फिफा विश्वचषक २०२६, महासंग्राम भारतात शुक्रवारपासून दिसणार

अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको यांच्या संयुक्त यजमानपदाखाली फिफा विश्वचषक २०२६ या फुटबॉलच्या महासंग्रामाला सुरुवात होत आहे. प्रथमच ४८ संघ, १०४ सामने आणि तीन देशांमध्ये रंगणारी ही स्पर्धा फुटबॉल इतिहासातील सर्वात भव्य विश्वचषक ठरणार आहे. मेक्सिको सिटी येथे यजमान मेक्सिको आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील सामन्याने स्पर्धेचा शुभारंभ होणार असून जगभरातील अब्जावधी चाहत्यांचे लक्ष या महासंग्रामाकडे लागले आहे.यंदाच्या स्पर्धेत अनेक दिग्गज खेळाडूंच्या कारकिर्दीतील हा शेवटचा विश्वचषक ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळे लिओनेल मेस्सी आणि ख्रिस्तियानो रोनाल्डो यांच्या कामगिरीकडे विशेष लक्ष असेल. गतविजेता अर्जेंटिना आणि त्यांचा कर्णधार मेस्सी पूर्णपणे तंदुरुस्त असल्याने संघाच्या आशा उंचावल्या आहेत. दुसरीकडे, ४० वर्षीय रोनाल्डो पोर्तुगालला पहिले विश्वविजेतेपद मिळवून देण्यासाठी सज्ज आहे.

यंदाच्या विश्वचषकात फ्रान्स, इंग्लंड, अर्जेंटिना, स्पेन, ब्राझील, पोर्तुगाल आणि जर्मनी हे प्रमुख विजेतेपदाचे दावेदार मानले जात आहेत. तर इक्वेडोर, बेल्जियम, मोरोक्को आणि उरुग्वे हे संघ मोठे धक्के देऊ शकतात.विश्वचषकातील सर्वाधिक चर्चेचा विषय ठरली आहे गोल्डन बूटची शर्यत. २०२२ मध्ये आठ गोल करत गोल्डन बूट पटकावणारा फ्रान्सचा सुपरस्टार किलियन एम्बाप्पे पुन्हा एकदा आघाडीचा दावेदार मानला जात आहे. त्याने आतापर्यंत १४ विश्वचषक सामन्यांत १२ गोल केले आहेत. इंग्लंडचा कर्णधार हॅरी केन दुसऱ्यांदा गोल्डन बूट जिंकण्याच्या प्रयत्नात असेल. २०१८ मध्ये त्याने सहा गोल करत हा किताब जिंकला होता.स्पेनचा मिकेल ओयार्झाबाल, नॉर्वेचा गोलमशीन एर्लिंग हालांड, अर्जेंटिनाचा लिओनेल मेस्सी, पोर्तुगालचा ख्रिस्तियानो रोनाल्डो, स्पेनचा युवा स्टार लामिन यामाल, फ्रान्सचा उस्मान डेंबेले तसेच ब्राझीलचे विनिसियस ज्युनियर आणि राफिन्हा हेही गोल्डन बूटच्या शर्यतीतील प्रमुख दावेदार आहेत.

विश्वचषकाच्या पहिल्याच दिवशी यजमान मेक्सिकोसमोर दक्षिण आफ्रिकेचे आव्हान असेल, तर दुसऱ्या सामन्यात दक्षिण कोरिया आणि झेक प्रजासत्ताक आमनेसामने येतील. गट फेरीपासूनच अनेक रोमांचक सामने पाहायला मिळणार असून प्रत्येक गुणासाठी संघांमध्ये चुरस रंगणार आहे. फुटबॉलप्रेमींसाठी ही स्पर्धा केवळ खेळ नाही, तर भावना, इतिहास आणि स्वप्नांची लढाई आहे. मेस्सी-रोनाल्डोच्या अखेरच्या विश्वचषकातील जादू, एम्बाप्पे-हालांडची गोलांची बरसात आणि नव्या विश्वविजेत्याच्या शोधामुळे पुढील काही आठवडे संपूर्ण जग फुटबॉलमय होणार आहे.


दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# कवी मनोहर आंधळे यांच्या कवितेचा इयत्ता चौथीच्या पाठ्यपुस्तकात समावेश


चाळीसगाव येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक तथा महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा चाळीसगावचे कार्याध्यक्ष कवी-मनोहर ना.आंधळे यांच्या जिंकू आम्ही लढाई या बालकवितेचा  महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे,बालभारती तर्फे इयत्ता चौथी (इंग्रजी माध्यम शाळा) या वर्गासाठी शैक्षणिक वर्ष सन २०२६-२७ पासूनच्या नवीन अभ्यासक्रम पाठ्यपुस्तक "शिकू मराठी आनंदाने" मध्ये समावेश करण्यात आला आहे.

यापूर्वी हीच कविता जिंकू आम्ही लढाई (KTBS) कर्नाटक टेक्स्ट बूक सोसायटी, बेंगलोर कडून इयत्ता सातवीच्या वर्गासाठी सन २०१९ पासून पुढील दहा वर्षासाठी निवडली गेली आहे.

तसेच सन २०२३ पासून गुजरात राज्य अभ्यासक्रम मंडळाने कवी मनोहर आंधळे यांची अवतरले शिवराय ही "किशोर" मासिक फेब्रुवारी २०२० मध्ये प्रसिद्ध कविता इयत्ता पाचवी च्या मराठी विषय अभ्यासक्रमात घेतली आहे.




तर सन २०१५ मध्ये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या TYBA अभ्यासक्रमातील "उपयोजित मराठी" संदर्भ ग्रंथ पुस्तकात सारांश लेखनासाठी कविता समाविष्ट आहे.




गेल्या पस्तीस वर्षांपासून कविता लिखाण करणाऱ्या कवी मनोहर आंधळे यांच्या आजतागायत २९ कविता बालभारतीच्या "किशोर" मासिक पुणे मधून प्रसिद्ध झालेल्या आहेत. महाराष्ट्रातील नामवंत दिवाळी अंक व मासिकातून त्यांच्या अनेक कविता प्रसिद्ध झालेल्या आहेत.त्यांचे "सौरभ", "लेकी तुझ्यासाठी" व "डोळ्यात कालचे पाणी" हे काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत.



उपरोक्त चौथीच्या अभ्यासक्रमासाठी "निवडक किशोर" या ग्रंथातून निवडली गेल्याचे पत्र बालभारती कार्यालयातून आंधळे यांना प्राप्त झाले आहे. या उल्लेखनीय यशाप्रित्यर्थ महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा चाळीसगाव चे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य तानसेन जगताप, मसाप शाखा कार्यकारी विश्वस्त तथा पत्रकार किसनराव जोर्वेकर,मसाप जिल्हा प्रतिनिधी अनुक्रमे गणेश आढाव व प्राचार्य  वासुदेव वले(पाचोरा), बालभारती अभ्यासक्रम मंडळ सदस्य सुनील गायकवाड, ज्येष्ठ बंधू प्रा.वा.ना. आंधळे(एरंडोल),म.सा.प.चाळीसगाव शाखेचे पदाधिकारी व सदस्य तसेच सेवा सहकारी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव राजेश राठोड, उपाध्यक्ष मच्छिंद्र राठोड, संचालक योगेश चव्हाण यांचेसह जिल्ह्यातील साहित्यिक व शिक्षक मित्रांनी कवी आंधळेंचे अभिनंदन केले आहे.

## पत्रकारितेचा ३५ वर्षांचा निरंतर आणि ध्येयवादी प्रवास: ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांच्या लेखणीला नवी झळाळी

विद्यार्थी दशेपासूनच वाचनाची आणि लेखनाची आवड जोपासत लोकशाहीच्या चौथ्या स्तंभात म्हणजेच वृत्तपत्र क्षेत्रात पदार्पण करणारे आष्टीचे सुपुत्र आणि 'दैनिक झुंजारनेता'चे उपसंपादक, ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांच्या पत्रकारितेतील अविरत प्रवासाला आज ३५ वर्षे पूर्ण झाली आहेत. एका ध्येयाने व निस्वार्थ भावनेने सुरू केलेला हा प्रवास आज खऱ्या अर्थाने सार्थकी लागल्याचे पाहायला मिळत आहे. आष्टी येथील महाविद्यालयातून माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर उत्तम बोडखे यांनी पत्रकारितेचा पवित्र वसा हाती घेतला. प्रारंभीच्या काळात या क्षेत्रात भविष्याची कोणतीही आर्थिक शाश्वती नसताना, केवळ समाजपरिवर्तनाची आस आणि अन्यायाला वाचा फोडण्याची तीव्र ऊर्मी त्यांना या क्षेत्रात ओढून घेऊन आली. अत्यंत प्रामाणिकपणे, समतोल विचारांच्या चौकटीत राहून आणि सकारात्मक दृष्टिकोन अंगीकारून त्यांनी आपल्या या खडतर प्रवासाला सुरुवात केली. गेल्या साडेतीन दशकांच्या या प्रदीर्घ प्रवासात त्यांची लेखणी अधिकाधिक प्रगल्भ आणि धारदार होत गेली. समाजातील तळागाळातील उपेक्षितांचे प्रश्न आणि अनेक लपलेल्या ज्वलंत समस्या त्यांनी आपल्या शोध पत्रकारितेच्या



माध्यमातून अत्यंत धैर्याने चव्हाट्यावर आणल्या. गुणवंतांचे यश समाजासमोर आणून त्यांना मुख्य प्रवाहात मानाचे स्थान मिळवून देण्यापासून ते ग्रामीण भागातील रस्त्यांचे रखडलेले प्रश्न, शेतकरी बांधवांवर होणारा अन्याय आणि प्रशासनाच्या चुकीच्या व वेळकाढू धोरणांवर त्यांनी नेहमीच आपल्या सडेतोड शब्दांचे प्रहार केले. त्यांच्या या निर्भीड, निष्पक्ष आणि तत्वनिष्ठ लेखणीची दखल घेत अनेक सामाजिक संघटना व नामांकित संस्थांनी त्यांना विविध राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. पाठीवर पडलेल्या या कौतुकाच्या थापेमुळे त्यांचा सामाजिक कृतज्ञतेचा भाव अधिकच दुणावला आणि त्यांच्या लेखणीला एक नवा वैचारिक आयाम मिळाला. आज उत्तम बोडखे हे 'दैनिक झुंजारनेता'च्या उपसंपादक पदाची महत्त्वाची व जबाबदारीची धुरा अत्यंत सक्षमपणे आणि कौशल्याने सांभाळत आहेत. केवळ बातम्या देण्यापुरते मर्यादित न राहता विविध राजकीय पक्ष, सामाजिक, धार्मिक संघटना, तसेच शैक्षणिक व वैचारिक क्षेत्राशी त्यांनी जोडलेले सलोख्याचे आणि स्नेहपूर्ण संबंध त्यांच्या व्यापक कार्यकर्तृत्वाची आणि अजातशत्रू व्यक्तित्वाची साक्ष देतात. उपसंपादक पदाची ही धुरा आणि पत्रकारितेतील यशस्वी व गौरवशाली ३५ वर्षे या दुहेरी सुवर्ण टप्प्यावर आज आष्टी तालुक्यातील सर्व पत्रकार बांधव, मित्रपरिवार आणि वाचकांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. शब्द आणि विचारांचे पक्के अधिष्ठान लाभलेल्या लोकशाहीच्या या खऱ्या पहारेकऱ्याला पुढील वाटचालीसाठी आणि त्यांच्या दमदार लेखणीला भविष्यातही असेच अथांग बळ, ऊर्जा आणि नवी शक्ती लाभो, याच सर्व स्तरांतून मनःपूर्वक सदिच्छा!

## चकलांबा पोलिसांची अवैध वाळू वाहतुकीवर मोठी कारवाई; 60 लाखाचा मुद्देमाल जप्त

**चकलांबा** | दिनांक 10/06/2026 रोजी चकलांबा पोलीस स्टेशनच्या हद्दीत गायकवाड जळगाव व मालेगाव शिवारात दोन वेगवेगळ्या ठिकाणी गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळू वाहतूक करणार्यांवर पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल ₹60 लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दिनांक 10/06/2026 रोजी सकाळी 10:30 वाजण्याच्या सुमारास गायकवाड जळगाव व मालेगाव खु. शिवारात गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळू वाहतुकीवर करणाऱ्या दोन हायवांवर वेगवेगळ्या ठिकाणी ही कारवाई करण्यात आली. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ही धडक कारवाई करण्यात आली.

या कारवाईत पोलिसांनी दोन भारत बेन्झ कंपनीचे हायवा जप्त केले असून त्यामध्ये अवैध वाळू वाहतूक करतांना रंगेहाथ पकडण्यात आले आहेत. एकूण ₹60,30,000 चा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला.



या प्रकरणी 1) प्रदीप बंकट कदम(वय 26) रा. सुरळेगाव 2) रत्नेश्वर उर्फ बाळू शहादेव खेडकर (वय 33), रा. चकलांबा, 3) ता. गेवराई, जि. बीड यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांनी कोणताही परवाना नसताना स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी अवैध वाळू वाहतूक केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

या संदर्भात चकलांबा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा क्रमांक 190/2026 व 191/2026 नोंदविण्यात आला असून, भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 303(2) अंतर्गत कारवाई करण्यात आले आहेत.


सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, प्रभारी पोलीस अधीक्षक चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक समिर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके मार्गदर्शनाखाली सपोनि सचिन इंगळे, पोह/बांगर, पोना/गुजर, पोलीस अंमलदार मुकेश बनसोडे, रमेश बारगजे, हनुमान इंगोले यांनी केली आहे.

# मेंढपाळांचे स्थलांतर रोखण्यासाठी अर्ध बंदिस्त मेंढीपालन योजनेचा प्रकल्प अहवाल सादर करा

**मंत्रालयातील आढावा बैठकीत ना. पंकजाताई मुंडे यांचे निर्देश**

**कृषी मंत्री दत्ता भरणे, आ. अडसड यांची बैठकीला उपस्थिती**







**मुंबई :** राज्यातील मेंढपाळांची भटकंती थांबविण्यासाठी अशा मेंढपाळांची माहिती जमा करून प्रायोगिक तत्वावर अर्धबंदिस्त पद्धतीने मेंढीपालन प्रकल्प योजना राबविण्यासाठी अभ्यास अहवाल सादर करण्याचे निर्देश पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आज दिले.

राज्यातील मेंढपाळांच्या भटकंती व स्थलांतराच्या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आढावा बैठक पार पडली. यावेळी कृषी मंत्री दत्ता भरणे, आमदार प्रताप अडसड, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन, पुण्यश्लोक अहिल्याबाई महाराष्ट्र मेंढी विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. शीतलकुमार मुकणे, अमरावती मेंढपाळ धनगर विकास मंचचे अध्यक्ष संतोष महात्मे आदि उपस्थित होते.

महाराष्ट्रातील बहुतांश मेंढपाळ मेंढीपालन व्यवसायासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करत असतात. त्यामुळे त्यांना शिक्षण, आरोग्य, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. वैद्यकीय सुविधा वेळेवर उपलब्ध होत नसल्याने काही ठिकाणी जीवितहानीच्या घटनाही घडतात. या समस्यांवर कायमस्वरूपी उपाय शोधण्यासाठी अभ्यास अहवाल सादर करण्याचे निर्देश श्रीमती मुंडे यांनी यावेळी दिले.

### ■ प्रकल्प अहवाल सादर करा

यावेळी प्रामुख्याने एका ठिकाणी अर्धबंदिस्त पद्धतीने मेंढीपालन करण्याच्या संकल्पनेवर चर्चा करण्यात आली. प्रायोगिक तत्त्वावर अर्धबंदिस्त मेंढीपालन व्यवसाय सुरू करण्याबाबत अभ्यास अहवाल सादर करण्याच्या सूचना मंत्री पंकजा मुंडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.अहवाल प्राप्त झाल्यानंतर अर्धबंदिस्त शेळी व मेंढीपालनासाठी आवश्यक पुढील उपाययोजना करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

### ■ मेंढपाळांसाठी राजे होळकर महामेष योजना

सध्या 'राजे होळकर महामेष योजना' अंतर्गत वैयक्तिक लाभाची योजना राबविण्यात येत आहे. ही योजना मेंढपाळ बचत गट किंवा सहकारी संस्थांना सामूहिक स्वरूपात दिल्यास एका ठिकाणी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करता येतील.  त्यामुळे मेंढपाळांचे वारंवार होणारे स्थलांतर कमी होऊन त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक प्रगतीला चालना मिळू शकते, असे त्यांनी यावेळी सांगितले.

कृषी मंत्री दत्ता भरणे यांनीही या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

# तोहीद खान हत्याप्रकरणात आणखी आरोपींचा सहभाग? सुरेश धस यांनी व्यक्त केला संशय

## खान कुटुंबीयांची भेट घेऊन न्यायासाठी लढण्याचे आश्वासन एसआयटी चौकशी व सक्षम सरकारी वकिलाची मागणी







**परळी | प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील परळी येथे घडलेल्या तोहीद खान हत्याप्रकरणी भाजप आमदार सुरेश धस यांनी खान कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेत न्याय मिळवून देण्यासाठी आपण कुटुंबासोबत ठामपणे उभे असल्याचे आश्वासन दिले. यावेळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी या प्रकरणातील तपासाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले.

धस म्हणाले की, 36 वर्षीय तोहीद खान यांचा अत्यंत निर्घृणपणे खून करण्यात आला. केवळ खून करून आरोपी थांबले नाहीत, तर मृतदेह वाहनातून गावभर फिरवून रेल्वे पटरीवर टाकत हा प्रकार रेल्वे अपघात असल्याचे भासविण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यामुळे या संपूर्ण घटनेची सखोल आणि निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे.

खान कुटुंबीयांनी या प्रकरणात सक्षम सरकारी वकील नियुक्त करण्याची मागणी केली असून, सध्या अटक करण्यात आलेले दोन आरोपीच या गुन्ह्यात सहभागी आहेत की आणखी काही जणांचा सहभाग आहे, याचाही तपास खोलवर जाऊन व्हावा, अशी मागणी त्यांनी केली.

परळी पोलीस दलातील काही अधिकारी व कर्मचारी आरोपींना अप्रत्यक्षपणे मदत करत असल्याचे आरोप समाजातील विविध घटकांकडून होत असल्याचेही धस यांनी नमूद केले. त्यामुळे या प्रकरणाचा तपास स्वतंत्र विशेष तपास पथकाकडे (SIT) सोपविण्याची मागणी कुटुंबीयांनी केल्याचे त्यांनी सांगितले.

संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर जिल्ह्यात काही प्रमाणात शांतता निर्माण झाल्याचे मान्य करताना धस म्हणाले की, जिल्ह्याच्या पश्चिम भागात परिस्थिती सुधारली असली तरी काही समाजकंटक अद्यापही अशा गंभीर घटना घडवत आहेत.

येत्या मंगळवारी मुख्यमंत्री यांची भेट घेऊन तोहीद खान हत्याप्रकरणाची संपूर्ण माहिती देणार असल्याचे सांगत धस यांनी हे प्रकरण विधिमंडळातही जोरदारपणे मांडणार असल्याचे स्पष्ट केले.

दरम्यान, या प्रकरणाशी संबंधित व्हायरल कॉल रेकॉर्डिंगमधील काही संभाषणे अत्यंत आक्षेपार्ह असून त्यातून आणखी काही व्यक्तींचा सहभाग असल्याचा संशय निर्माण होत असल्याचे त्यांनी म्हटले. या रेकॉर्डिंगचीही सखोल चौकशी करून सत्य समोर आणावे, अशी मागणी त्यांनी केली.

# पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीचा कौडगाव हुडा ग्रामपंचायतीमध्ये मोठा भ्रष्टाचार

## सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवक यांच्या मनमानी विरोधात ग्रामस्थांचे बेमुदत हिशोब द्या आंदोलन



**परळी (प्रतिनिधी)**

परळी तालुक्यातील कौडगाव हुडा ग्रामपंचायतीमध्ये पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीमध्ये सरपंच उपसरपंच व ग्रामसेवक यांनी संगनमत करून मोठा भ्रष्टाचार केल्याचा आरोप गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आला आहे. ग्रामपंचायतीच्या कामांमध्ये झालेला भ्रष्टाचार जनतेसमोर उघडकीस आनण्यासाठी मागच्या 4 जूनपासून कौडगाव हुडा ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीच्या कार्यालयासमोरच पंधराव्या वित्त आयोगाच्या मंजूर निधीचा हिशोब गावकऱ्यांना मिळावा यासाठी बेमुदत हिशोब द्या आंदोलन पुकारले आहे. 4 जूनला आंदोलन सुरू करण्यापूर्वी सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रय गव्हाणे आणि गावकऱ्यांच्या वतीने परळीचे गटविकास अधिकारी यांना पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीत झालेल्या भ्रष्टाचाराबद्दल एक निवेदन दिले होते. गावकऱ्यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने बिडीओ यांनी एक चौकशी समिती देखिल नेमली होती परंतु, त्या समितीने झालेल्या भ्रष्टाचाराबद्दल चौकशी केली नसल्याचा आरोप कौडगाव हुडा ग्रामस्थांचा आहे. ग्रामपंचायतीच्या 15 व्या वित्त आयोगाच्या भ्रष्टाचाराची चौकशी करून लवकरात लवकर सत्य परिस्थिती बिडीओंनी सर्वांसमोर आणावी अन्यथा येणाऱ्या काळात बीड जिल्हापरिषद सिईओ आणि जिल्हाधिकारी बीड यांच्या कार्यालयासमोर मोठे आंदोलन करण्याचा इशारा दत्ताय गव्हाणे आणि गावकरी मंडळींनी दिला आहे.

### ■ ग्रामसभा न घेताच ग्रामसभा घेतल्याची ऑनलाईन नोंद

कौडगाव हुडा ग्रामस्थांच्या वतीने 4 जून पासून पंधराव्या वित्त आयोगाच्या कामातील भ्रष्टाचार उघडकीस आनण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयासमोर बेमुदत हिशोब द्या आंदोलन सुरू आहे परंतु 5 जुनला जागतिक पर्यावरण दिनाच्या दिवशी कौडगाव हुडा गावात ग्रामसभा घेण्यात आली अशी मनमानी सरपंच उपसरपंच व ग्रामसेकांनी केली आहे. कौडगाव गावामध्ये 5 जून रोजी कुठेही ग्रामसभा न घेता ग्रामसभा 5 जूनला पार पडल्याची ऑनलाईन नोंद करण्यात आली असल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे.

### प्रशासनाचे आंदोलनाकडे दुर्लक्ष

**पंधराव्या वित्त आयोगाच्या कामांमध्ये झालेला भ्रष्टाचार सर्वांसमोर आनण्यासाठी कौडगाव हुडा गावच्या ग्रामस्थांनी 4 जून पासून बेमुदत हिशोब द्या आंदोलन पुकारलेले आहे. 5 जूनला गावकऱ्यांच्या वतीने आंदोलनासंदर्भात सिरसाळा पोलीस स्टेशनला निवेदन देखिल देण्यात आले होते परंतु,पोलीस प्रशासनाने आंदोलन स्थळी कसल्याही प्रकारची सुरक्षा पुरवली नसल्याचा गावकऱ्यांचा आरोप आहे. महसुल प्रशासनाच्या वतीने आंदोलनाची परिस्थिती फक्त गावचे पोलीस पाटील पाहत असल्याचे गावकऱ्यांच्या वतीने सांगण्यात आले. दोन दिवसांपुर्वी आंदोलन स्थळी विद्युत पुरवठा देखिल खंडित करण्यात आल्याचा आक्षेप गावकऱ्यानीं नोंदवला आहे. विद्युत पुरवठा खंडित झाल्याने रात्री एक साप देखिल आंदोलनस्थळी आल्याची तक्रार गावकऱ्यांनी केली आहे.**

# सिरसाळा पोलिस ठाण्यात ‘मिसिंग सेल’ची स्थापना

## हरवलेली बालके, महिला व बालकामगारांच्या शोधासाठी विशेष पथक कार्यरत

**सिरसाळा | अतुल बडे**

हरवलेली बालके, महिला तसेच बालकामगारांचा शोध घेण्यासाठी सिरसाळा पोलिस ठाण्यात ‘मिसिंग सेल’ची स्थापना करण्यात आली असून या उपक्रमाला ‘ऑपरेशन IV’ असे नाव देण्यात आले आहे. पोलिस अधीक्षकांच्या आदेशानुसार सुरू करण्यात आलेल्या या विशेष उपक्रमामुळे हरवलेल्या व्यक्तींचा शोध अधिक प्रभावीपणे घेता येणार आहे.

या विशेष पथकात पोलीस उपनिरीक्षक संजयकुमार राठोड, पोलीस शिपाई ज्ञानेश्वर तोर आणि महिला पोलीस शिपाई जगदाळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सिरसाळा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील १८ वर्षांखालील हरवलेली बालके, हरवलेल्या महिला तसेच १४ वर्षांखालील बालकामगारांचा शोध घेण्याची जबाबदारी या पथकावर सोपविण्यात आली आहे.

सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हे पथक कार्यरत राहणार असल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक संजयकुमार राठोड यांनी दिली.

**सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हे पथक कार्यरत राहणार असल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक संजयकुमार राठोड यांनी दिली.**




या मोहिमेअंतर्गत आश्रमगृहे, अशासकीय संस्था, बसस्थानके, पर्यटन व धार्मिक स्थळे, रस्त्यावर भीक मागणारी मुले, कचरा गोळा करणारी मुले तसेच हॉटेल्स, दुकाने आणि वीटभट्ट्या येथे विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे.

तपासणीदरम्यान अल्पवयीन मुलांची चौकशी करून त्यांची माहिती संकलित केली जाणार असून, बेकायदेशीरपणे काम करणाऱ्या बालकामगारांचा शोध घेऊन त्यांना योग्य संरक्षण व मदत मिळवून देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येणार आहे.


# सोनसाखळी चोरीनंतर मुर्शदपूर भागात घरफोडी, अवैध धंद्यांमुळे गुन्हेगारीत वाढ; पोलिसांच्या गस्तीवर प्रश्नचिन्ह

**आष्टी | प्रतिनिधी**

शहरात गेल्या काही दिवसांपासून महिलांच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावण्याच्या घटना वारंवार घडत असतानाच, आता घरफोडीच्या घटनेने खळबळ उडाली आहे. मुर्शदपूर भागात स्वामी समर्थ मंदिराजवळ राहणाऱ्या एका कुटुंबाचे बाहेरगावी गेले असता अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून ३६ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

प्राप्त माहितीनुसार, ७ जून रोजी रात्री १२ ते ८ जून रोजी सकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान ही घरफोडी झाली. कुटुंबिय घरी नसल्याची संधी साधून चोरट्यांनी घरात प्रवेश केला आणि घरातील लॅपटॉप, २ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, रोख ४हजार रुपये, ७हजार रुपये किमतीचे चांदीचे पैंजण व गळ्यातील चांदीची चेन असा एकूण ३६ हजार रुपये किमतीचा ऐवज लंपास केला. सकाळी शेजाऱ्यांच्या हा प्रकार लक्षात आल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली.

आष्टी शहरात अवैध धंद्यांनी कळस गाठला आहे. हातभट्टी दारू, मटका, अवैध गुटखा विक्री राजरोस सुरू असल्याने गुन्हेगारी प्रवृत्ती वाढली आहे. सोनसाखळी चोरी व घरफोड्यांच्या घटना वाढूनही पोलिसांची रात्रीची गस्त समाधानकारक नसल्याने चोरट्यांचे फावत असल्याचे बोलले जात आहे. सतत घडणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे शहरातील महिला व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, पोलीस प्रशासनाने रात्रीची गस्त वाढवून अवैध धंद्यांवर तातडीने कारवाई करावी व चोऱ्यांचा तात्काळ छडा लावावा, अशी मागणी नागरिकांमधून जोर धरू लागली आहे.



# फुलसावंगी येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दीर्घायुष्यासाठी महाआरती



**महागाव | प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी फुलसावंगी मंडळाच्या वतीने आज दिनांक 10 जून 2026 रोजी सायंकाळी 6.00 वाजता येथील श्री संत साधू महाराज मंदिरात भारताचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी सलग सर्वाधिक काळ ( 4399 दिवस) देशाची सेवा करणारे पंतप्रधान म्हणून विक्रम प्रस्थापित केल्याबद्दल त्यांच्या दीर्घायुष्य,उत्तम आरोग्य व निरंतर राष्ट्रसेवेसाठी विशेष पूजा-अर्चना व महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी उपस्थितांनी पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली देशाने विविध क्षेत्रांत केलेल्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले तसेच त्यांच्या उत्तम आरोग्य व दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली.

कार्यक्रमात राष्ट्रहित,जनकल्याण व विकसित भारताच्या संकल्पनेला बळ देण्यासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याचा संकल्प केला. पूजा-अर्चना व महाआरतीनंतर उपस्थितांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष योगेश वाजपेयी,प्रमोद शेळके,डॉ. गजानन वैद्य,प्रवीण जिल्हावार,तानाजी शिंदे,गजानन शिंदे,आशिष शर्मा,गणेश भगत,आनंद वीर,प्रमोद महाजन,नथू पराते,संदीप शेळके,जांबुवता आडे,रमेश पाचखंडे,अरविंद राठोड,सुमित वैद्य,निशांत पराते,राहुल कुकडे,आकाश कवाने,अभय जांबुतकर,अर्जुन बागडे,चेतन जाधव,मोहन गोभेकर हे उपस्थित होते.